**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 5 | Jan 2015**
**ISSN:- 2393-8900**

Research Article

# *हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात मराठवाडयातील दलितांचा सहभाग*

*अनिल कठारे*

इतिहास विभाग प्रमुख,, श्री शिवाजी कॉलेज, कंधार, जि. नांदेड.

***सांराश :***

ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतात जवळपास 563 देशी राज्ये आणि संस्थाने होती. या राज्याचा आणि संस्थानाचा राज्यकारभार देशी राजे व संस्थानिक पाहात असत. दक्षिण भारतात त्रावणकोर, बडोदा, कोल्हापूर, नागपूर आणि हैदराबाद ही तीन राज्ये होती. यामध्ये हैदराबादचे राज्य आकाराने दुस–या क्रमांकाचे होते, त्यामुळे ते महत्वाचे होते. मोगल सम्राट औरंगजेब 20 फेब्रुवारी 1707 रोजी मरण पावली. त्यांच्यानंतर सत्तेवर आलेले मोगल सम्राट दुर्बल व कर्तृत्वहीन निघाले. याचाच फायदा घेऊन दक्षिणेचे सुभेदार मीर कमरूद्दीन चिन कुलीज खान निजाम उल मुल्क यानी 31 जुलै 1724 रोजी दक्षिणेत स्वतंत्र राज्याची स्थापना केली. या राज्याची राजधानी हैदराबाद होती. या राज्याच्या गादीवर वंशपरंपरेने होऊन गेलेल्या सत्ताधिशंना निजाम व आसफजाह या नावाने ओळखले जात असे. हैदराबाद राज्यात मराठवाडा, तेलंगण व कर्नाटक या प्रादेशिक विभागांचा समावेश होत होता.

***प्रस्तावना :***

### *हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम म्हणजे काय?*

1947 मध्ये ब्रिटिशांनी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास केला. या कायद्यानुसार 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत ब्रिटिशांच्या राजकीय वर्चस्वातून मुक्त झाला. म्हणजेच भारताला स्वातंत्र्य मिळाले. वरील कायद्यानुसार देशी राज्ये आणि संस्थानिकांनाही त्यांनी आपले राज्य भारतात की पाकिस्तानात विलीन करावयाचे की, स्वतंत्र राहावयाचे या बाबतीत स्वातंत्र्य दिलेले होते. त्यामुळे देशी राज्य व संस्थाने भारतीय संघराज्यात कशी विलीन करून घ्यावायाची हा मोठा प्रश्न भारत सरकारपुढे निर्माण झाला. शेवटी हैद्राबाद भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी बहूतेक संस्थाने भारतात विलिन करून घेतली परंतु हैदराबाद राज्याचे सत्ताधिश निजाम मीर उस्मान अली खान यानी 11 जून 1947 रोजी आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले.

निजामाने आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे घोषित केल्यामुळे भारत सरकार आणि हैदराबाद राज्यातील जनदेपुढे मोठा पेच व प्रश्न निर्माण झाला. हैदराबाद राज्यचे सत्ताधिश मुसलमान होते. परंतु राज्यात 70 टक्के हिंदू, 18 टक्के दलित, 11 टक्के मुसलमान आणि 1 टक्के इतर लोक होते. तसेच निजामाची सत्ता अन्यायी, अत्याचारी होती. याशिवाय देशाच्या व दख्खनच्या मध्यभागी असलेले आणि देशात आकाराने दुस–या क्रमांकाचे असलेले हैदराबाद राज्य स्वतंत्र राहाणे राज्यातील जनतेच्याच नवहे तर देशाच्याही हिताचे नव्हते. तसेच हैदराबाद राज्याच्या भारतातील विलिनीकरणशिवाय भारताच्या स्वातंत्र्याला पुर्णतव प्राप्त होणार नव्हते. त्यामुळे राज्यातील जनतेने हैदराबाद राज्याचे भारतीय संघराज्यात विलिनीकरण करण्यासाठी सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले. शेवटी 13 सप्टेंबर 1948 रोजी भारत सरकारने हैदराबाद राज्यावर लष्करी करवाई करून ते भारतीय संघराज्यात विलीन करून घेतले. हैदराबाद राज्याच्या विलिनीकरणासाठी जनतेने जे सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले, हेच आंदोलन भारतीय इतिहासात हैदराबादच्या स्वतंत्र्य–संग्राम या नावाने ओळखले जाते. हा स्वातंत्र्य संग्राम भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचाच एक भाग होता. या स्वातंत्र्य मराठयाडयातील दलितांचाही सहभागी मोठा होता.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हैदराबादचा स्वातंत्र्य संग्रामः

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील दलितांचे नेते होते. त्यामुळे हैदराबाद राज्यातील दलित चळवळही त्यांच्यांच विचार व मार्गदर्शनानुसार चालत होती. त्यांनी हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामास पाठींबा देऊन निजामाला सक्त विरोध केला होता. मग हैदराबाद राज्यातील दलित निजामाला पाठींबा का देतील? हैदराबाद राज्य भारतीय संघराज्यात विलीन करून घेण्याच्या कार्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सिंहाचा वाटा आहे. राज्यातील दलित चळवळ बाबासाहेबांच्या विचारानुसार व प्रेरणेने कार्य करीत होती. हैदराबाद स्टेट शेडयुल्ड कास्ट फेडरेश नही संघटना आंबेडकरी विचाराची होती. या मागणीस स्टेट कॉंग्रेसने पाठींबा दिला होता. पुढे स्टेट कॉंग्रेसने हैदराबाद राज्य भारतात विलीन करण्याची मागणी केली, तेंव्हा हैदराबाद स्टेट शेडयुल्ड कास्ट फेडरेशन या संघटनेने ही मागणी शेवटपर्यत उचलून धरली होती. हैदराबाद राज्य भारतात विलीन झाले पाहिजे, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पूर्वीपासूनच भूमिका होती.या भूमिकेतूनच त्यांनी 5 जून 1947 चा फ्री प्रेस जर्नल, 18, जून 1947 चा दि बॉबे क्रॉनिकल, 8 जूलै 1947 चा दि टाईम्स ऑफ इंडिया, 28 नोव्हेंबर 1947 चा नॅशनल स्टॅन्डर्ड आणि जनता या वर्तमानपत्रातून निजामाच्या विरूध्द आपली मते व पत्रके प्रसिध्द केली होती.

भारत देश स्वतंत्र झाला परंतु हैदराबाद राज्य भारतात विलीन करण्यास निजाम मीर उस्मान अलीखानी बहादूर हे तयार नव्हते. ते रझाकाराच्या व इत्तेहादूल मुसलमीन या संघटनेच्या बळावर आझाम हैदराबाद ठेवण्याची स्वप्न पाहात होते. त्यांनी आझाद हैदराबादची घोषणा केली. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हैदराबाद राज्य भारतात विलीन करण्याचा सल्ला निजामाला दिला. तसेच आपले राज्य स्वतंत्र ठेवून त्यास संयुक्त राष्ट्रसंघाची मान्यता व संरक्षण मिळविण्याचा प्रयत्य करणे व तशी आशा करणे म्हणजे आपण आपल्या कल्पनेच्या साम्राज्यात व्यर्थ वावरण्यासारखे आहे असा इशाराही त्यांनी निजामाला दिला होता. 7 ऑगस्ट 1947 पासून स्टेट कॉंग्रेसने हैदराबाद मुक्तीसाठी सशस्त्र आंदोलनास सुरूवात केली. या आंदोलनात राज्यातील दलितांनी मोठया प्रमाणात सहभाग घेतलेला होता. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजयातील दलितांनी पुढील इशा दिला होता.

''हैदराबाद राज्यातील अस्पृश्य बांधवांना मी असा इशारा देतो की, मुसलमांनांच्या छळापासून बचाव करण्यासाठी सुखा सुखी कोणीही धर्मातर करू नका, जबरदस्तीने मुसलमान झालेल्या अस्पृश्यांनीआपण कायमचे मुसलमान झालो असेही समजू नये. ते कधीही आपल्या धर्मात परत येऊ शेकतात व त्यांना सन्मानाने वागविले जाईल. अस्पृश्यांनी कोणत्याही परिस्थितीत आणि कितीही संकटे ओढवली तरी निजाम व इत्तेहादूल मुसलमान या संघटनेला साथ देऊ नये. सवर्ण हिंदू आपणावर कितीही संकटे ओढवली तरी निजाम व इत्तेहादूल मुसलमीम या संघटनेला साथ देऊ नये. अस्पृश्यांचा झगडा स्वातंत्र्यासाठी असून त्यांनी सर्व प्रकारचे स्वातंत्र्य हवे आहे, म्हणून ते स्वातंत्र्यासाठी झगडत आहेत. निजाम हा स्वातंत्र्याचा शत्रु आहे. त्या स्वातंत्र्याच्या शत्रुबरोबर अस्पृश्यांनी संगनमत केले तर त्यांचा मोठा घात होईल. निजाम हा हिंदुस्थानचा, आपल्या मातृभूमीचा शत्रु आहे ही गोष्ट अस्पृश्यांनी संगनमत केले तर त्यांचा मोठा घात होईल. निजाम हा हिंदुस्थानचा, आपल्या मातृभूमीचा शत्रु आहे ही गोष्ट अस्पृश्यांनी लक्षात घेतली पाहिजे, हैदराबाद संस्थान भारतात सामील झालेच पाहिजे व त्यासाठी आपण आग्रह धरला पाहिजे.कारण हिंदुस्थानची भौगोलीक एकता व अखंडता बिघडू देण्याचा हक्क कोणत्याही संस्थानाला नाही. हिंदी संघराज्याला जो विरोध निजामाने चालविला आहे. त्याबद्दल यत्किंचीतही गय करता कामा नये. निजामाला हे कळले पाहिजे की, हिंदी संघराज्यात तो जर सामील झाला आणि हिंदी राज्यघटनेने जर त्याच्या घराण्याला अभयवचन दिले तर त्याचे राजपद सुरक्षित होईल, इत्तेहादुल मुसलमानावर विश्वास टाकण्यापेक्षा हिंदूचा विश्वास संपादन करण्यात त्याला जास्त सुरक्षितता आहे. तथापित त्याने कसे वागावे हा त्याचा प्रश्न आहे. मला आज फक्त एवढीच तळमळ लागली आहे की, माझ्या बांधवांनी त्याला साथ देऊन आपल्या जातीच्या इमानदारीला काळीमा फासू नये, त्यांनी हे लक्षात ठेवावे की, निजाम हा अस्पृश्यांचा व अस्पृश्यांच्या मातृभूमीचा शत्रू आहे. अस्पृश जाती हया भारत भूमीची पहिली लेकरे आहेत. या हिंदूस्थानचे अस्पृश्य आदिसंतान आहेत. हिंदूस्थानातील इतर काही जातीची हिंदू ही जितकी मातृभूमी आहे तितकीच ती अस्पृश्यांचीही मातृभूमी आहे. या मायभूमीच्या मोठेपणासाठी त्यांनी झगडले पाहिजे. जितकी मातृभूमी आहे तितकीच ती अस्पृश्यांचीही मातृभूमीचा शत्रू आहे. अस्पृश्य जाती हया भारत भूमीची पहिली लेकरे आहेत. या हिंदूस्थानचे अस्पृश्य आदिसंतान आहेत. हिंदूस्थानातील इतर काही जातीची हिंद ही जितकी मातृभूमी आहे तितकीच ती अस्पृश्यांचीही मातृभूमी आहे. या मायभूमीच्या मोठेपणासाठी त्यांनी झगडले पाहिजे. मायभूमीचे स्वातंत्र्य व तिचे अखंडत्व कायम ठेवण्यासाठी त्यांनी जिवाभावाने लढण्यास तयार झाले पाहिजे. हिंदुस्थान हे आपले घर आहे, आपले वतन आहे, ही गोष्ट अस्पृश्यांनी कधी विसरता काम नये.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे कायदेमंत्री होती. गृहमंत्री सरदार पटेल यांनी हैदराबाद राज्य भारतात विलीन घेण्यासाठी लष्करी कारवाई करण्याचे ठरविले. त्यपूर्वी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराबरोबर त्याबाबत चर्चा केली. त्यावेळी बाबासाहेबांनी त्यांनी नेटाने पाठींबा दिला. त्यानुसार 13 सप्टेंबर 1947 रोजी हैदराबाद राज्यावर भारत सरकारने लष्करी करवाई केली. या घटनेस ऑपरेशन पोलो असेही म्हणतात. वास्तविक पाहाता भारत सरकारने हैदराबाद राज्यावर लष्करी कारवाई केली होती. परंतु लष्करी कारवाई असे म्हटल्यास कासदेशीर आंतरराष्ट्रीय प्रश्न निर्माण होईल. म्हणून या कारवाईस कायदेमंत्री डॉ. भीमराव रामजी उर्फ बाबासाहेब आंबेडकरांनी पोलिस ॲक्शन असे नाव देण्याचे भारत सरकारला सूचविले. कारण पोलिस ॲक्शन या शब्दामूळे हैदराबाद राज्याच्या विलीनीकरणाचा प्रश्न

हा भारताचा अंतर्गत प्रश्न ठरणार होता. स्वामीजी व दिगंबरराव बिंदू यांनी पंडित नेहरू, महात्मा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांच्याशी चर्चा करून हैदराबाद राज्याच्या विलीनीकरणासाठी भारत सरकारने पोलिस कारवाई करवाई करावी अशी त्यांनी विनंती केली होती. त्यानुसार भारत सरकारने लोकहितासाठी या राज्यावर ॲक्शन घेण्याचे ठरविले. 13 सप्टेंबर 1948 रोजी पहाटे चार वाजता पोलिस कारवाई सुरू झाली. त्याच दिवशी स्टेट कॉंग्रेसच्या कृति समितीने नागपूरला बैठक घेऊन या बैठकीत निजामाला पदच्यूत करण्याची मागणी करणारा ठराव पास केला होता.

### *आर्य समाजाच्या सत्याग्रहात सहभागः*

हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाची खरी सुरूवाती आर्य समाजानेच केली. आर्य समाजानेच हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाची पायाभरणी केली. या समाजाने सर्व प्रथम राज्यात हिंदू समाजासाठी सुधारणांचे कार्यक्रम हाती घेतले. धर्म आणि सुधारणेचे कार्यक्रम आर्य समाजाने एकाचवेळी राबविले. या समाजाच्या सामाजिक आणि धार्मिक कार्यामुळे हिंदू समाज जागृत व संघटित झाला. आर्य समाजाने हे जनजागृतीचे कार्य केले नसते तर हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात राज्यातील संपूर्ण समाज पेटून उठला नसता. आर्य समाजाच्या अशा कार्यामुळेच निजाम सरकारच्या विरोधात 27 ऑक्टोबर 1938 रोजी सत्याग्रह सुरू केला. हा सत्याग्रह 9 ऑगस्ट 1939 पर्यत चालू होता.

### *दलितांचा सहभागः*

हैदराबाद राज्यात दलित समाजाचे प्रबोधन करण्याचे कार्य समाजानेच सर्वप्रथम केले. त्यामुळे दलित सामाजिक आणि धार्मिकदृष्टया जागृत झाले. हिंदू लोकांनी दलितांना विषमतेची वागणूक दिली. अस्पृश्यतेच्या नावाखाली त्यांनी अपमानास्पद वागणूक दिली. तसेच त्यांच्यावर अन्याय आणि अत्याचार केले. याउलट आर्य समाजाचे सर्व मानव समान मानला. या समाजाने जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता नष्ट करण्याचे आणि दलितांच्या उध्दाराचे कार्य सुरू केले. आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले. त्यामुळे राज्यातील दलित समाज आर्य समाजाकडे आकर्षित झाला. आर्य समाजानेही दलितांना आपल्यात सामावून घेतले व त्यांना समानतेची वागणूक दिली. त्यामुळे 27 ऑक्टोबर 1938 रोजी आर्य समाजाने सुरू केलेल्या सत्याग्रहात प्रामुख्याने दलित लोकांचाच भरणा होता.

लोहा जिल्हा नांदेड येथील विश्वनाथ माधव महाबळे, महादेव संभाजी महाबळे, ग्यानोबाराव तुकारामजी धुतमल, विठ्ठल उकडजी महाबळे व संभा नामदेव कापूरे या दलितांनी पोलीसांचा ससेमीरा चूकवून पैठणला जाऊन सत्याग्रह केला. त्यांना पैठणच्या निजामसाहीत न्यायालयाने 24 ऑगस्ट 1948 फसली रोजी तीन वर्षे चार महिन्याची शिक्षा ठोठावली. यानंतर त्यांना प्रथम औरंगाबाद व नंतर हैदराबादच्या तुरूंगात ठेवण्यात आले. आर्य समाजाच्या दलित सत्याग्रहींची नावे पुढील प्रमाणे

| | Ukko | Xkko | Rkkyqdk |
|---|---|---|---|
| 1- | ;Yylik xkik dkcG | Ek:e | mejxk |
| 2- | Hkkunkl lHkkth xk;dokM | vkjkn | |
| 3- | Ukkeno jkek dkcG | Ek:e | mejxk |
| 4- | Ekk:rh Hkkj | | mejxk |
| 5- | Ekdnk Hkj | | mejxk |
| 6- | gjhck /kkMhck | j.kkij | j.kkij |
| 7- | x.kir Hkxr | Ykkrj | Ykkrj |
| 8- | Hkxoku Hkkunkl xk;dokM | Ykkrj | Ykkrj |
| 9- | foBBy j?kukFk dkcG | bV | Hke |
| 10- | jkuck fyckth xk;dokM | fuyxk | fuyxk |
| 11- | Lkrjke ek/kojko grkxG | fuyxk | fuyxk |
| 12- | lHkk foBegkj fpyor | Vcyxk | fuyxk |

| | | | |
|---|---|---|---|
| 13- | Ukkx fHkejko l;o"kh | Eknljh | fuyxk |
| 14- | rG"khjke n"kjFk dkcG | Pkkdj | Pkkdj |
| 15- | Djck foBkck | Pkkdj | Pkkdj |
| 16- | Lkkuck /kkfMck | Pkkdj | Pkkdj |
| 17- | Hkhejko rdkjke culkM | gG.kh | vgenij |
| 18- | lVokth dkcG | [kMkGh | vgenij |
| 19- | Yk{e.k fdlu lkudkcG | uGxhj | mnxhj |
| 20- | fdlu rdkjke cykM | uGxhj | mnxhj |

## महाराष्ट्र परिषद आणि दलित समाज

तेलंगणात आंध्र महासभा व कर्नाटकात कर्नाटक महासभा या संघटना आपापल्या प्रांतात लोक संघटन व जनजागृतीने कार्य करीत होत्या. अशी संघटना मराठवाडयातही असावी असे वाटत असल्याने कार्यकर्त्यांनी त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. इ.स. 1937 साली महाराष्ट्र परिषद स्थापन करण्यात आली. या संघटनेच्या स्थापनेसाठी रा. गा. परांजपे, केशवराव कोरटकर, काशिनाथराव वैद्य, एकनाथराव कुलकर्णी, अनंत भालेराव, गोविंदभाई श्रॉफ, वामनराव पाईक, माणिकचंद पहाडे, दिगंबर बिंदू पुरूषोत्तम चपळगावकर, विठ्ठल रंगनाथ देशपांडे, रामचंद्रराव अंतू, लक्ष्मणराव ग्यानू व लक्ष्मणराव फाटक यांनी प्रयत्न केले होते. महाराष्ट्र परिषदेची एकूण सहा अधिवेशने संपन्न झाली.

महाराष्ट्र परिषदेच्या प्रत्येक अधिवेशनात त्या त्या भागातील दलितांनी सहभागी घेऊन महराष्ट्र परिषदेच्या राजकीय चळवळीस गतीमान करण्यास हातभार लावला. महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन 1 व 2 जूप 1938 रोजी लातूर येथे संपन्न झाले, तर 1946 मध्ये सहावे आणि शेवटचे अधिवेशन पुन्हा लातूर येथेच संपन्न झाले. या दोन्ही अधिवेशनात लातूर–उस्मानाबाद परिसरातील दलित सहभागी झाले होते. शेतकरी कामगार पक्षाचे पुढारी भाई उध्दवराव पाटील हे उस्मानाबाद जिल्हयातील परंडा तालुक्यातील इर्ला या खेडेगावात जन्माला आलेले होते. पुढे त्यांचे वास्तव्य उस्मानाबादलाच राहिले. 1946 या मध्ये लातूरला महाराष्ट्र परिषदेचे सहावे आणि शेवटचे अधिवेशन संपन्न झाले. या अधिवेशनात भाई उध्दवरावपाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि नरसिंगरावच्या मार्गदर्शनाखाली उस्मानाबाद येथुन शेतकरी व शेतमजूरांचा मोर्चा येऊन धडकला. अधिवेशनात जिकडे तिकडे शेतकरी व शेतमजूरच अधिक प्रमाणात दिसत होते. मोर्चात सहभागी झालेले शेतकरी व शेतमजूर सावकारशाही ठेचायची हाय भक्षक हा रक्षक होऊ शकत नही. या दोन घोषणा देत होते. या मोर्चात लातूर – उस्मानाबाद परिसरातीला शेतकरी, शेतमजूर आणि दलितांचा मोठा सहभाग होता. या मोर्चात अर्थात महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनात पुढील दलितांनी सहभाग नोंदविला.

1 संभाजी इंगळे – राजूरी  2 मुरलीधर कठारे –सारोळा बु.  3 लक्ष्मण इंगळे–राजूरी
4 धोंडीबा इंगळे – जागजी  5 रामभाऊ माने – जागजी  6 मोहन लांडगे–काजळा
7 रामा वाघमारे– लातूर  8 रेवण वाघमारे – लातूर  साहेबराव सांवत–कन्हेरवाडी ता.कळंब

महाराष्ट्र परिषदेच्या प्रत्येक अधिवेशनात त्या त्या भागातील दलितांनी सहभाग घेतला होता. जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक विनायकराव चारठाणकर यांनीही महाराष्ट्र परिषदेत हरिजन मंडळी असल्याने स्पष्ट म्हटले आहे. परभणी येथील डॉ. तुकाराम ग्यानोजी गाडे यांनी 1944 पासून 1947 पर्यत महाराष्ट्र परिषदेत सक्रीय सहभाग घेतला होता. परंतु या परिषदेने आपल्या कोणत्याही अधिवेशनात दलितांच्या उध्दाराचा एकही ठराव पास केला नाही.

## हैदराबाद स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह– 1938

29 जून 1938 रोजी हैदराबादेतील मवाळा नेत्यांनी काशीनाथराव वैद्य यांच्या निवासस्थानी एक बैठक घेऊन हैदराबाद स्टेट कॉंग्रेसची स्थापना केली. याच बैठकीत कोग्रेसची एक अस्थायी समितीही स्थापन केली. पुढे 9 सप्टेंबर 1938 रोजी सरकारचे विश्वासू व आवडते ग्रहस्थ जी. रामाचारी हे सरकारचे विश्वासू असल्याने त्यांना विचारल्याशिवाय सरकार स्टेट कॉंग्रेसच्या विरोधात काहीही करणार नाही, अशी मवाळ नेत्यांची भ्रामक कल्पना होती. परंतु सरकारने स्टेट कॉंग्रेसची रीतसर स्थापना होण्यापूर्वीच 8 सप्टेंबर 1939 रोजी सरकारने पब्लीक सेहृटी रेग्युलेशन या कायद्याने कॉंग्रेसच्या स्थापनेवर बंदी घातली जी रामाचारी यांच्या बंगल्यावर 9 सप्टेंबर 1938 रोजी हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या स्थापनेची घोषणा करण्यासाठी जी आमसभा बोलविण्यात आली होती, ती आमसभाच बेकायदेशीर असल्याचे सरकारने कॉंग्रेसच्या अस्थायी समितीला कळविले. हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या स्थापनेवर घातलेली बंदी उठविण्यासाठी 1938 मध्ये

स्टेट कॉंग्रेसने सत्याग्रह केला.

1938 च्या सत्याग्रहात मराठवाडयातील लोकांचा सर्वाधिक भरणा होता. स्टेट कॉंग्रेसच्या कृति समितीचे अध्यक्ष गोविंदराव नानल यांनी 24 ऑक्टोबर 1938 रोजी कायदेभंग करून हैदराबाद स्टेट करून दीपावलीच्या पहिल्या दिवशी सुलतान बाजारात तार कचेरीसमोर सरकारच्या विरोधात सत्याग्रह सुरू केला, कृती समिती हीच सत्याग्रहीची पहिली होती. या पहिल्याच तुकडीत राज्यातील हरीजन सेवक संघाचे सचिव रविनारायण रेंी यांनी सहभाग घेऊन सत्याग्रह केला होता. हरीजन सेवक संघाचे अध्यक्ष श्री वामनराव नाईक यांनही सत्याग्रही म्हणून स्वामी रामानंद तीर्थाकडे आपले नाव नोंदविले होते. स्टेट कॉंग्रेसच्या सत्याग्रहात ब–याच दलितांनी सहभाग घेतला होता. जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक आणि स्टेट कॉंग्रेसचे परभणी जिल्हयातील नेते विनायकराव चारठाणकर यांनी म्हटले की स्टेट कॉंग्रेस व महाराष्ट्र परिषदेत आमच्याबरोबर हरीजन मंडळी होती. तसेच मुसलमान मंडळीही होती. हिंगोली जिल्हयातील वसमत येथील लांडगे केशव सिताराम लांडगे हनुमंत विश्वानाथ व लांडगे केशव सिताराम यांनी 23 दिवस कच्चा कैदेत काढले. सत्याग्रह केल्यामुळे त्यांनी सहा महिने सक्त मजूरी 25 रूप्ये दंडाची शिक्षा झाली. लांडगे हनुमंत विश्वनाथ यांनी 24 डिसेंबर 1938 रोजी आपल्या तीन सहका–यासह वसमत येथे सत्याग्रह केला. त्याबद्दल त्यांना दोन वर्षे सक्तमजूरी व 200 रूपये दंडाची शिक्षा झाली. सार्वत्रिक सुटकेबरोबर पाच महिन्यानंतर ते सुटल. सर्वात्रिक सुटकेबरोबर पाच महिन्यानंतर ते सुटल. यानंतर त्यांनी कॉंग्रेसचे संघटक म्हणून कार्य केले. लांडगे बाबूराव सिताराम यांनीही 1938 मध्ये स्टेट कॉंग्रेसच्या सत्याग्रहात सहभाग घेतला. त्याबद्दल त्यांना दोन वर्षे सक्त मजूरीची शिक्षा झाली. सहा महिन्यानंतर सार्वत्रिक सुटकेबरोबर त्यांचीही सुटका झाली.

1942 च्याही सत्याग्रहात राज्यातील दलितांनी आपला सहभाग नोंदविला. हिंगोली जिल्हयात वसमत तालुक्यात संभाजी कोल्हे नावाचा एक दलित होता. त्यानी 1942 च्या सत्याग्रहात सहभाग घेतला. त्यांच्या संदर्भात जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक वसमतचे गंगाप्रसादजी अग्रवाल यांचे मत लक्षात घेण्यासारखे असून ते महत्त्वाचे आहे. ते म्हणतात आमच्या तालुक्यामध्ये संभाजी कोल्हे म्हणून एक दलित होते. ते शेवटपर्यत आमच्या आंदोलनात होते. गंगाप्रसादजी अग्रवाल यांनी 1442 च्या छोडो भारच आंदोलनात सक्रीय सहभाग घेतला होता. उस्मानाबाद जिल्हयात भूम तालुक्यात आष्टा नावाचे एक खेडेगाव आहे. हे गाव भूम–परांड रस्त्यावर भूमपासून साधारणपणे बारा कि.मी. अंतरावर आहे. येथील भानुदासराव वाघमारे हे स्टेट कॉंग्रेसचे सक्रीय सत्याग्रही होते. त्यांनी 1942 च्या स्टेट कॉंग्रेसच्या आंदोलनात सहभाग घेतला. त्यांच्यासोबत आंबीचे विश्वनाथ गायकवाड होते. आंबी हे गाव परंडा–पाथरूड रस्त्यावर असून ते परंडयापासून साधारणपणे 30 कि.मी. अंतरावर आहे.

बीड जिल्हयात केज तालुक्यात नांदूरघाट नावाचे खेडेगाव आहे. येथील सिताराम नामदेव वाघमारे हे सुरूवातीपासूनच हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या कार्याशी संबंधित होते. बीड जिल्हयात बीड व अंबाजोगाई याठिकाणी सत्याग्रहाची केंद्रे होती. सिताराम वाघमारेयांनी  अंबाजीगाई येथे येऊन सत्याग्रह केला. त्यांच्याबरोबर कळंब तालुक्यातील कन्हेरवाडी येथील साहेबराव गुणाजी सावंत होते. साहेबराव सावंत यांनीही सत्याग्रहात सहभाग घेतला. मूळ चाकूरचे परंतु सध्या उदगीर येथे स्थायिक झाल्येल्या तुळशीराम दशरथ कांबळे यांचा सहभाग घेतला. मूळ चाकूरचे परंतु सध्या उदगीर येथे स्थायिक झालेल्या तुळशीराम दशरथ कांबळे यांचा 1942 च्या आंदोलनात सहभाग होता. ते स्टेट कॉंग्रेसचे सक्रीय कार्यकर्ते होते. लातूर तालुक्यातील मोगरगा येथील सोनवणे केशवराव सिताराम, केज तालुक्यातील मांगवडगाव येथील साठे मारूती रामजी व लातूर येथील विठ्ठल निवृत्ती महार यांनी 1942 च्या सत्याग्रहात सहभाग घेतला. विठ्ठल निवृत्ती यांनी विध्वंसक कार्यात भाग घेतला. त्याबद्दल त्यांना एक महिन्याची शिक्षा व 50 रूप्ये दंड झाला.

1942 च्या आंदोलनात देगलूर तालुक्यातील पुढील दलितांनी सहभाग घेऊन महत्त्वची भूमिका बजावली.

| | |
|---|---|
| 1 गाडे बाबुरव जळबाजी, मांग करखेड | 2 तोटरे तुकाराम कोंडीबा, मांग, करडखेड |
| 3 शिंदे बालाजी रामराव, मांग करडखेड | 4 सोनकांबहे इरबुनाक, महार, मुजळगा |
| 5कांबळे मल्हारी, महार, मुजळगा | 6 गवलवाड बाबनाक लालू, मांग, मुजळगा |
| 7 गवलवाड सुटवा, मांग, मुजळगा | 8 कांबडे गोविंद बालाजी, महार मुजळगा |
| 9 सोनकांबळे हैबती जयराम, महार, मुजळगा | 10 गायकांबळे बापूराव मरीबा, मांग, देगाव |
| 11 गायकांबळे नागोराव मरीबा, मांग, देगाव | 12 गायकांबळे बापूराव मरीबा, मांग, देगाव |
| 13 वाघमारे चांदू खंडू, महार, देगाव | 14 गायकांबळे खंडेरव, मांग, देगाव |

### *झेंडा सत्याग्रह–1947*

3 जूलै 1946 रोजी सरकारने हैदराबाद स्टेट कॉंग्रेस वरील बंदी उठविली. त्यानंतर कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन हैदराबाद शहरात मुशीराबाद भागात 16,17 व 18 जून 1947 रोजी भरले. या अधिवेशनात कॉंग्रेसची कार्यकारीणी जाहिर केली. स्वामीजींची अध्यक्ष म्हणून व जे. के. प्राणैशाचार्य यांची सरचिटणीस पदावर निवडझाली. या अधिवेशनात लोकांना अंतिम लढयासाठर आवाहन करणारा ठराव बी. रामकृष्णराव यांनी मांडला व त्यास दिगंबरराव बिंदूनी अनुमोदन दिले. 11 जून 1947 रोजी निजामाने आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळै कॉंग्रेसने स्वामी रामानंद तीर्थाच्या नेतृत्वाखाली पुन्हा स्वातंत्र्य राहणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे स्टेट कॉंग्रेसने स्वामी रामानंद तीर्थाच्या

नेतृत्वाखाली पुन्हा स्वातंत्र्य लढयाला सुरूवात केली. त्यांनी आता कायदेभंगाच्या चळवळीला प्रारंभ केला. 7 ऑगस्ट 1947 हा दिवस संघराज्यात विलीन होण्याचा दिन आणि 15 ऑगस्ट 1947 हा दिवस भारतीय स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करण्याचे स्टेट कॉग्रेसने ठरविले. तसेच या दिवशी भारताचा तिरंगा ध्वज फडकावून सत्याग्रह करण्यात येणार होता.

जलना तालुक्यातील गारेखगाव येथील वामरराव निकाळजे या बौध्द व्यक्तिने आपल्या गावातील हनूमान मंदिराच्या प्रांगणात गुप्तरित्या तिरंगा ध्वज उभारला व ते भीतीमुळे किसन पाटलाच्या मळयात भूमिगत झाले. पुढे ते एक महिन्यानंतर परत आले. तिरंगा फडकविल्याच्या दुस–या दिवशी गावात येऊन सरकारी शिपायाने पंचनामा केला व अहवाल सरकारला सादर केला. हा ध्वज लावल्याबद्दल पोलीस कारवाईनंतर निकाळजे यांना स्वातंत्र्य सैनिकाचे प्रमाणपत्र मिळण्याऐवजी गावातील किसन पाटलाला ते प्रमाणपत्र मळाले. शेवटी निकाळजे यांचे तोंड बंद करण्यासाठी नामांतराच्या काळात 1978 साली गावक–यांनी त्यांच्यावर हल्ला केला. परिणामी त्यांना आपले गाव सोडून औरंगाबादला स्थायीक व्हावे लागले. ठाणे अजिंठा अंतर्गत असलेल्या शिवणा येथील सदाशिवराव जगताप यांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज लावून निजाम सरकारचा निषेध केला. पण पोलीस कारवाईच्या काळात मात्र त्यांच्या घरावर गावक–यांनी हल्ला केला. नांदेड जिल्हयातील हदगाव येथील लहानू कांबळे यांनीही ध्वज फडकविण्याच्य कार्यक्रमात सहभाग घेतला होता. हदगाव तालुक्यातील डोरली येथे 1947 साली आयोजित केलेल्या ध्वजवंदनाच्या कार्यक्रमात पाथरडचे निजामी पोतिसांनी केलेल्या गोळीबारात संभाजी कावळे हे ठार झाले होत.

### *जंगल सत्याग्रह :*

हैदराबाद स्टेट कॉग्रेसच्या कृति समितीने राज्यातील जनतेला ऑगस्ट 1947 रोजी खेडयापाडयातून जंगल सत्याग्रह करण्याचा आदेश दिला. त्यांनुसार जनतेने ऑगस्ट 1947 पासूनच जंगल सत्याग्रह सुरू केला यामध्ये साग, मोह, ताडी व शिंदीची झाडे तोडण्याचा निर्णय घेण्यात आला. ही झाडे तोडण्यासाठी सरकारची बंदी होती तसेच तो कायद्यानुसार गुन्हा होता. ताडीची लाखो झाडे राज्यात होती. तसेच प्रत्येक ताडीच्या झाडाचे जंगल हाते. अशी झाडे तोडून जंगले साफ करणे असे जंगल सत्याग्रहाचे स्वरूप होते. स्टेट कॉग्रेसचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ यांनी कायदेभंग करून जंगल सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. हा जंगल सत्याग्रह ऑगस्ट 1947 पासून सप्टेंबर 1948 पर्यत चालू होता. हा सत्याग्रह हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाचाच एक भाग होता.

नांदेड जिल्हयातील डोरली येथील सत्याग्रहात पाथरडचे यादवराव हरिहरराव पवर मास्तर व इतर आठ दलित लोक सहभागी झाले. या सत्याग्रहात पोलिसांनी हल्ला केला. त्यामध्ये विश्वनाथा नागोजी कांबळे, शिवा मल्हारी कदम व दामोदर नागोजी कांबळे हे दलित जखमी झाले होते. दाती ता. कळमनुरी जि. परभणी येथे दिपाजी पाटलाच्या विचारांनी 7 नोंव्हेबर 1947 रोजी जंगल सत्याग्रह झाला. त्यामध्ये राजा वलद के–या, राम्या, जळबा, संभाजी गुल्या, हणमंता सख्या, लक्ष्या राम्या, रामा नागोबा, महादू मसाजी, शिक्या सख्खा, चांद्या भोज्या, मशा महाद्याा, सटवा कोंडया, विठया मेहाद्या व राध्या मेझ्या या दलितांनी सहाशे शिंदीची झाडे तोडली. त्यांना अबकारी कायदेभंगाबद्दल पाच महिन्याची सक्त मजूरीची शिक्षा झाली.हदगाव तालुक्यातील निवघा या ठिकाणी 1947 साली झालेल्या जंगल सत्याग्रहात संभा पुरभा एडके या दलिताने भाग घेतला. याचवेळी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात नरबा, गंगाराम पवार, महादू बापूजी पवार वसंभाजी एडके हे दलित ठार झाले. त्यानंतर त्यांची प्रेते विहितरीत फेकून देण्यात आली. ता.गंगापूर खरडी येथील केशवराव नाडे, ता. कन्नड, बहिरगाव येथील भागाजी बन्से व तुळशीराम मोरे, ता. गंगापूर, कायगाव येथील माधवराव तूपे, ता. कन्नड, निभोरा येथील नारायणराव मैराळ, ता.गंगापूर, इटावा येथील भिकाजी महापूरे व सटवाजी बनसोडे या दलितांनीही जंगल सत्याग्रहात भाग घेतला.

### *हैदराबाद स्टेट कॉंग्रेसचे सशस्त्र आंदोलन व दलित समाज :*

हैदराबाद राज्याच्या स्वातंत्र्यासाठी हैदराबाद स्टेट कॉग्रेसने अहिसांत्मक मार्गाने सत्याग्रहाची चळवळ सुरू केलेली होती. परंतु सत्याग्रह चळवळीपुढे निजाम सरकार नमलेले नव्हते. ते रझाकार, रोहिले, पठाण, अरब पोलिस आणि लष्कराच्या मदतीने सत्याग्रहीवर अन्याय, अत्याचार, लाठीहल्ले व गोळीबार करीत असे आणि सत्याग्रहाची चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत असे. अशावेळी हैदराबाद राज्याच्या स्वातंत्र्यासाठी निजाम सरकारशी सशस्त्र लढा देणे आवश्यक झाले होते. हैदराबाद स्टेट कॉग्रेसने राज्याच्या सरहद्दीवर लष्करी कॅपस् स्थापन करून सशस्त्र आंदोलन करण्याचा आदेश जनतेला दिला. त्यानुसार राज्याच्या सरहद्दीवर लष्करी कॅपस् उभारून जनतेने निजाम सरकारशी सशस्त्र लढा देण्यास प्रारंभ केला. या सशस्त्र लढयात राज्यातील 21,000 लोकांनी सहभाग घेतला.

### *समाजवादी जनराज्यासाठी लढा :*

1942 च्या आंदोलनात सहभागी झालेल्या समाजवादी नेत्यांनी संस्थानातील खेडी मुक्त करून त्याठिकाणी स्वतंत्र जनराज्याची स्थापना करण्याचे ठरविले. त्यानुसार सर्वप्रथम राचप्पा बिडप यांच्या नेतृत्वाखाली स्थापना केली. या

राज्याचे प्रमुख अमृत गडकरी होते. मरावाडयातील गावे मुक्त करण्यासाठी साहसी तरूणांची नावे नोंदविण्याचा कार्यक्रम येवला व पूणतांबा कॅपवर करण्यात आला. नांदेड व कंधार तालुक्यातील तरूणांचे संघटन केशवराव कुलकर्णी व वैजापूर तालुक्यातील तरूणांचे संघटन प्रभाकर हरदास यांनी केले. हदगावचे कमलाकांत सोनूले, वैजापूरचे बळीराम भगत तुकाराम गायकवाड या दलितांनी येवला कॅपवर आपली नावे नोंदविलेल्या तरूणांचे मनमाड येथे एक अभ्यास शिबीर घेऊन त्यांचे एक लष्करी दल निर्माण केले. या लष्कारी दलाचे सेनापती नांदेचे अमृत गडकरी होते तर सरसेनापती कंधारचे केशवराव कुलकर्णी होते. पुणतांबा, येवला व हरेगाव या कॅपवर वास्तव्य असलेल्या या लष्करी दलास अंकाईच्या डोंगरात भोला चटर्जी बंगाल ज जगजीवन गुजरात यांनी लष्करी प्रशिक्षण दिले. या लष्कराने सर्वप्रथम उस्मानाबाद सीमेवरील ढोकी नाका उदध्वस्त केला. यानंतर 7 जून 1948 रोजी अमृत गडकरी यांच्या नेतृत्वाखाली हल्ला करून वैजापूर तालुक्यातील गोवर्धन व सराळा ही गावे करोडगीरी नाका ताब्यात घेतला. या हल्ल्यात प्रभाकर हरदास, द.भा. शिरूरकर, मानसिंह राजपूत, लक्ष्मण अंकटवार, लक्ष्मण दावलू पेटलोड, गणपत गौळकर जोशी व कमलाकांत सोनुले दलित यांनी सहभाग घेतला. मगनसिंह राजपूत व दशरथ गायकवाड यांनी वैजापूर तालुक्यातील भालगाव करोडगिरी नाक्याची माहिती मिळविल्यानंतर त्यावर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात दशरथ गायकवाड व तुकाराम भगत या दलितांचा सहभाग होता. समाजवादी जनराज्य स्थापन करण्याच्या कार्यात पुढील दलितांनी सहभाग घेतला.

| | |
|---|---|
| 1.दशरथ गंगाराम गायकवाड | 2. कचरू भगवंत त्रिभुवन |
| 3. रंगनाथ गंगाराम त्रिभुवन | 4. घनशाम सोमवंशी |
| 5. बालाजी भागोजी सोमवंशी | 6. लक्ष्मण गंगाराम त्रिभुवन |
| 7. बाबुराव किसन गायकवाड | 8. माधव तुका उबाळे |
| 9.कारभारी माहदू कदम | 10.रामा महादू थोरात |
| 11. माधवराव लक्ष्मण गायवाड | 12. देवीदास म्हातारजी झाल्टे |
| 13. तुकाराम लक्ष्मण भगत | 14. खंडू फकिरा जाधव |
| 15. हरीभाउ भागाजी सोमवंशी | 16. कमलाकांत सोनुले |

### *रझाकार विरूध्द दलितांचा लढा—*

रझाकर हे हत्तेहादूल मुसलमीन या संघटनेचे लष्कर म्हणजेच या संघटनेच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली कार्य करणारी लष्करी संघटना किंवा लष्करी विभाग होता. इ.स. 1940 मध्ये इत्तेहादचे अध्यक्ष बहादूरयार जंग यांनी हैदराबाद येथे रझाकार संघटना स्थापन केली. या संघनेल इत्तेहादच्या कार्यकारीणीने मान्यता दिली. रझाकार म्हणजे धुळीत पडलेल्यांना वर उचलणारा स्वयंसेवक होय. इत्तेहादच्या कार्यकरीणीने राज्यात ठिकठिकाणी रझाकार संघटना स्थापन केल्या.

रझाकार हे इत्तेहादूल मुसलमीन या संघटनेचे लष्कर होते. हे रझाकार निजामाच्या सत्तेचे संरक्षक होते. निजामाचाच रझाकारांना आशिर्वाद असल्यामुहे रझाकार मुसलमानतेत्तर स्त्री – पुरूषांवर भयंकर अत्याचार आणि अन्याय करीत असत. याच रझाकारांच्या पाठींब्यावर निजाम मीर उस्मान अलीखान यानी आपले राज्य स्वतंत्र ठेचण्याची घोषणा केली होती. त्यामुळे हैदराबाद स्टेट कॉग्रेसने रझाकारांशी प्रतिकार करण्यासाठी सशस्त्र लढा देण्याचे आवाहन जनतेला केले. त्यामुळे जनतेने ठिकठिकाणी रझाकार केंद्रावार आणि दिसेल तेथे रझाकारावर हल्ले केले.

उस्मानाबाद तालुक्यातील सारोळा बु. येथील एकनाथ कठारे व अंबादास कठारे यांनी एका शेरण्या नावाच्या रझाकाराला ठार केले व त्यास गावाजवळील विहीरीत फेकून दिले. तुळजापूर तालुक्यातील आपसिंगा येथील गंग्या मांग यानेही रझाकाराशी लढा दिला होता कळंब येथील आर्यसमाजाचे कार्यकर्ते गणपतराव कथल यांना रझाकरांनी पकडले, तेंव्हा येरमाळा येथील तात्याबा महादेव कांबळे व देवकांबळे यांनी त्यांची सुटात केली. गुजोटी ता. उमरगा येथील पूरी यांच्या घरी हरीपंत गुरूजींना कडब्याच्या भा—यात बांधून घराबाहेर सुखरूपपणे नेले. कोंडीबा जोंधळे यांनी गंगाधर सावकार कोमटी यांना त्यांच्या परिवारासह नाशिक कॅपवर पोहोचविले होते.

### *अरब , पठाण व रोहिल्याषी संघर्ष*

हैदराबाद राज्यात रझाकाराप्रमाणे अरब, पठाण रोहिले हिंदू जनतेवर अन्याय अत्याचार करीत असत. त्यामुळे राज्यातील जनतेला त्यांच्याशीही लढा द्यावा लागला. अरब, पठाण व रोहिले यांच्या अन्याय अत्याचाराचे स्वरूप पुढील प्रमाणे होते.

1.घराची अर्थिक लूट करणे.
2.बैल जोडी पळविणे.
3.घरावरचे पत्रे पळविणे.
4.बाजारात येण्यास मज्जात करणे.

5.हिंदूंना शिवीगाळ व मारहाण करणे
6.दलित व हिंदू स्त्री–पुरूषांना त्रास देणे.

वरील प्रकारच्या अन्याय आणि अत्याचारामुळे दलितांनी अनेक अरच पठाण आणि रोहिल्यांशी लढा दिला. नांदेड जिल्हा डिस्प्रेड क्लासेस असोसिएशनचे अध्यक्ष व दलित रझाकार प्रमुख हनुमंतराव मोरे आणि गणपतराव वाघमारे हे दोघेही नांदेड शहरात पायी चालत होते. दिवस पावसाळयाचे होते. पावसाची भूरभूर चालू होती. त्यांच्या डोक्यावर पोत्याचे घोंगडे होते व खांद्याला बंदूका होत्या. एका अरबाने एका हिंदू स्त्रीला ताब्यात घेतले होते व ती त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत होती. श्री हनुमंतराव मोरे यांनी तात्काळ खांद्याची बंदू काढून अरबावर गोळी झाडत त्याला ठार केले. नांदेड शहरात आंबेडकर नगर भागात राहणारे व दलित युवक संघाचे नेते चोखोवा ग्यानोजी जोंधळे यांनी भर बाजाराज एका रोहिल्याला झोडपून काढले होते. मुगट जि. नांदेड येथीला वाघोजी हटकर, नांदेड शहरात इतवारा भागातील सुदाम कार्ले, वाळकी बु. ता . हदगावचे मुगाजी कोंडजी सावते, आष्टी ता. हदगावचे तुकाराम गायकवाड व विश्वनाथ कानिंनदे, आष्टा कासार ता. उमरगा येथील मुरलीधर पंढरीनाथ कांबळे, चिंकदरा ता. तुळजापूर येथील केरबा महादेव गायवाड व मुळज ता. उमरगा येथील विठोबा कांबळे या बौध्द लोकांनी संधी मिळेल तेथे रोहिल्यांना बेदम मार दिला.

वाळकी बु. येथील रोहिला मन्सुरखान याने रामचंद्र देशमुख व इतर अनेकांच्या बागायती जमीनी हडप केल्या होत्या. त्याने वाळकीच्या परिसरात चांगलीच दहशत निर्माण केली होती. दलितांनाही तो त्रास देत होता. त्याने एका लमाणाची बायको रखेल म्हणून ठेवली हाती. अशा अन्यायी मन्सुरखानला त्याच्याच मळयात मुगाजी कोंडजी सावते यानी बंदुकीच्या गोळया घालून ठार केले. त्यामुळे रझाकारांनी मुगाजीचे कांडली येथील घर लूटून उध्वस्त केले. त्यापूर्वीचे त्यांचे आई वडील कोडजी व कोंडाबाई सावते हे जीव वाचविण्यासाठी साखरा येथे गेले होते. मन्सुरखानला अफजलखान व फैरोजखान ही दोन मुले होते. त्यापैकी अफजलखानो गावकऱ्याशी जुळवून घेतले. पण फैरोजखानाने मात्र नांदेडहून पोलिसांना वाळकीला बोलावले व तेथील रामचंद्र देशमुखाच्या वाडयाला वेढा दिला. या वाडयात आश्रासाठी आलेल्या आठ लोकांना वाडयाबाहेर एका दावणीला बांधले व सर्वांना बंदूकीच्या गोळया घालून ठार केले.

गौर ता. कळंब जि. उस्मानाबाद येथे सावरखान नावाचा रोहिला होता. तो सावकारकी करायचा. सावरकीच्या नावाखाली तो जनतेवर अन्याय अत्याचार करायचा. त्यामुळे तेथीलदलितासहीत संपूर्ण गावकऱ्यांनी त्याला ठार करावयाचे ठरविले. त्याचबरोबर त्याचे कापड दुकानही उडविण्याचे ठरविले. त्यानुसार चतुर्भूज पवार, बळीराम भानुदास माळी, विठ्ठलराव भगवानराव पाटील, अंबादास कुलर्णी, रामभाउ हरी धनगर पांडुरंग आण्णा लंगडे, आंबु संभु माळी , तेरचा चांभार , मुरूडची मांग–मंडळी , राजाभाउ मांग, विठया सोनवणे आणि गावकऱ्यांनी रात्री बारा वाजता सवरखानला मारण्यासाठी हालचाल सुरू केली. चर्तुभूजा पवारने सवरखानच्या कापड दुकानावर हातबॉब टाकला. परंतु त्यामध्ये सवरखान वाचला व त्याचा मुजीमच मेला. दुसऱ्या दिवशी सवरखानाने येरमाळयाचे रझाकार गावात आणले व त्यांनी संपूर्ण गाव लूटला. यावेळी रझाकारांना गावकऱ्यांनी प्रतिकार केला. परंतु त्यांचा निभाव लागला नाही. या हल्ल्यात विठ्ठलराव भगवानराव पाटील ,अंबादास कुलकर्णी, रामभाउ हरी धनगर , पांडुरंग शिवराम धनगर ,दशरथ आंबा लंगडे, पांडुरंग आण्णा लंगडे व आंबु संभु माळी या सात जणांना वीरमरण आले.

## गुप्तहेर/खबरे –

हैदराबाद स्वांतत्र्य संग्रामात दलितांनी गुप्तहेर म्हणून काम केले. हैदराबाद स्वातंत्र्य संग्रमाच्या काळात राज्याच्या सरहद्दीवरील भागात स्वातंत्र्य सैनिकांनी लष्करी कॅप उघडले होते. अशा कॅपवरील सैनिकांना त्यांच्या घरचा निरोप व सावधान राहण्याची खबर देण्याचे काम दलितांनी केले. काही महार रझाकार संघटनेत सामील असल्याने त्यांना रझाकार कोणत्या गावावर किंवा कॅपवर हल्ला करणारे आहेत हे अगोदर समजायचे. अशावेळी ही खबर गावकऱ्यांना व कॅपवरील सैनिकांना सांगण्याचे काम महाराने केल्यामुळे पुढील अनर्थ टळत असत.

1.काकासाहेब देशमुखाच्या मार्गदर्शनाखाली चाळीसगावच्या हद्दीतील कॅपवर रझाकार बॉब टाकणार असल्याची खबर तुकाराम खरात या मातंग व्यक्तीने पोहोचती केल्यामुळे पुढील अनर्थ टळला.
2.मौजे तळेगाव पिंपरी ता. भाकेरदन जि. जालना येथील बन्सी श्रावण साळवे हे ठाणे हसनाबाद येथील रझाकार संघटनेत असतानाही त्यांनी पिंपळगावावर रझाकाराच्या होणाऱ्या हल्ल्याची पूर्वसूचना गावकऱ्यांना दिली. त्यामुळे गावकऱ्यांना रझाकारांना प्रतिकार करता आला. रझाकारापासून एका हिंदू स्त्रीची इज्जत वाचविण्याचेही काम साळवे यांनी केले. टाकळी येथील स्टेट कॉग्रेसचे कार्यकर्ते लालजी यांनी इार करण्याचे रझाकारांनी ठरविले होते. या प्रसंगातूनही लालजींना वाचविण्याचे काम साळवे यांनी केले.
3.गौंडगावच्या कॅपला आपशिंगा ता. तुळजापूर येथील रझाकार केंद्राची माहिती देण्याचे काम तेथील दलितांनी केले.
4.मुरूम ता. उमरगा येथील हिंदूची कत्तल रझाकार करणार असल्याची खबर येथील तेथील शाळेतील मुख्याध्यापक सिरसाठ यांनी गावकऱ्यांना दिली होती.
5.परभणीचे डॉ. तुकाराम गाडे हे भूमिगत राहून स्टेट कॉग्रेसच्या कार्यकर्त्यांना रझाकाराच्या हालचालीची माहिती देत

असत.

6.कळमनुरी तालुक्यातील महारी या गावाचे विशा विठया खंदारे हेरगीरी करीत असताना 26 एप्रिल 1948 रोजी पोलीसांच्या गोळीबारात ठार झाले.

7.विनायकराव चारठाणकर व त्यांच्या सहकाऱ्यांना दुधना नदीच्या पात्रात जात असतांनाच कुरूजी वाळके यांनी त्यांना मार्ग बदलण्याचा इशारा केला त्यामुळे त्या सर्वांचे प्राण वाचले.

8.ळदगाव तालुक्यातील मनाठा येथील बुध्दाजी हे हेरगीरी करीत असतांनाच रझाकाराकडून मारले गेले.

9.हदगाव तालुक्यातील वाळकीचे संभाजी जयराम प्रघाणे हे रझाकाराच्या हालचालीची माहिती स्वातंत्र्य सैनिकांना देत असत.

10.वाडाळा–वाळसा कुंपच्या सैनिकांना जालना जिल्हातील टाकळी कोलते व पारध बु. येथील रझाकार केंद्राची माहिती हरिजनांनीच दिली होती. बंदनापूर पारध येथील हिंदूची कत्तल करण्याचा रझाकारांचा बेत होता. ही गुप्त माहिती तेथील शाळेचे मुख्याध्यापक वामनराव लोखंडे , निवृत्ती नायब सुभेदार गुरूजी यांनी गावकऱ्यांना सांगून सावध केले होते. जालना जिल्हातील भोजपूरी ता.अंबड येथील पांडू मास्तर , शंकर भिल्ल व बाजीराव भांदरगी हे हेरगीरी करीत.

11.उस्तानाबाद तालुक्यातील तडवळा कसबे येथील तुकाराम संभाजी बनसोडे चांभार हे नेहमी चिंचोली लष्करी कॅपवर जात असत आणि तेथील स्वातंत्र्य सैनिकांना गुप्त माहिती देत. कळंब तालुक्यातील गौर येथील लोकांना रझाकारांनी मारल्याची बातमी यानीच चिंचोली कॅपला दिली. स्वातंत्र्य सैनिकांना चहापणी करण्याचे आणि पायातील ....... पुरविण्याचेही काम त्यांनी केले.

12.उस्तानाबादहून हजेरी तालुकदार दारूने भरलेले दोन बॅरल घेवुन चालला होता. त्याचवेळी तेथे एक महाराजाचा गॅगमन होता. त्यांनी चिंचोली कॅपला ही बातमी दिली. त्यामुळे तेथील स्वातंत्र्य सैनिकांनी हजेरी तालुकादारास खामसवाडी येथे गाठले व त्याच्या जवळील दारूचे बॅरल लुटले. त्यासोबत असलेले काही पठाण व रझाकार पकडले व त्यांना कॅपवर आणले. करीमभाई व विठोबा महार यांनी त्यांना कापून ठार केले.

13.धामणगाव ता. आष्टी परिसरातील गणा कोतवाल, खंडू मांग, बाळू चांभार आणि आबा ससाणे महार हे मिरजगाव कॅपचे गुप्तहेर म्हणून काम करीत होते. वरणवाडीतील काही स्त्रियाही गुप्तहेर म्हणून काम करीत असत. ठकुबाई व सुंदराबाई ह्या त्यापैकीच होत. सुंदराबाई फार धाडसी होती. ती रझाकारालाही भित नसे. त्यामुळेच तिला नागवी बाई म्हणत.

14.उस्तानाबाद तालुक्यात उपळे माकडाचे याठिकाणी सशस्त्र लढयाचे केंद्र होते. त्याचे प्रमुख वळवंत यादव घोगरे होते. या केंद्रात गाडे पोस्टमन महार होता. ते सर्व गुप्त माहिती या केंद्राला पुरविले असे या केद्रातील सैनिकांनी परंडयाहून उस्तानाबादला जाणारी बस उपळया जवळ वडतळयाच्या लवणात अडवून लूटली व तिची नासधूस केली. यानंतर पोलिस स्वातंत्र्य सैनिकांना पकडण्यासाठी निघाले. ही बातमी गाडे पोस्टमॅनने दिल्यामुळे या केंद्रतील सैनिक पसार झाले. पकडण्यासाठी निघाले. ही बातमी गाडे पोस्टमॅनने दिल्यामुळे या केंद्रातील सैनिक पसार झाले.

15.उदगीर येथील चांदेगावकर तुळशीराम मरेप्पा यांनी सशस्त्र लढयाशिवाय गुप्तहेराचेही काम केले. त्यांनी उदगीर तालुक्यातील रामघाट कॅपमध्ये स्वातंत्र्य सैनिक म्हणून कार्य केले. आप्पाराव पाटील ,कवळखेडकर व माणिकराव मुळे, डोणगाव हे कॅपप्रमुख होते. चांदेगावकर यांनी या कॅपला गुप्त माहिती देण्याचे काम केले.

16.तडवळा कसबे ता. उस्तानाबाद येथील गोदावरी सोनवणे महार आणि माळयाची एक बाई हया तडवळा चिंचोली कॅपवर गुप्तहेर म्हणून काम करीत असत. मुरूड येथे कसमि रझवीचे भाषण झाले. त्यामध्ये तो प्रथम तडवळा ताब्यात घेवु त्यानंतर कळंबला जावु असे म्हटले होते. ही बातमी गोदावरी सोनवणे हिने दिल्यामुळे तडवळा चिंचोली कॅपमधील स्वातंत्र्य सैनिक सावध झाले.तसेच त्यांनी तडवळा व कळंब येथील लोकांना ही सावध राहण्याचा इशारा केला. खामसवाडी ता. कळंब येथील इश्या महारानेही गुप्तहेराचे काम केले.

17.तुकाराम खरात या मांगाने काकासाहेब देशमुखाच्या मार्गदर्शनाखाली चाळीसगावच्या हद्दीतील कॅपवर रझाकार बॅाब टाकणार होते. ही महत्वाची खबर कॅपवर पोहोचली होती.

18.आष्टाकासार ता.उस्तानाबाद येथील मुरलीधर पंढरीनाथ कांबळे चिंकदरा ता. तुळजापूर जि.उस्तानाबाद येथील केरबा महादेव गायवाड मुळज ता. उमरगा जि. उस्तानाबाद येथील विठेबा कांबळे या बौध्दांनी रझाकरांशी प्रतिकार तर केलाच, परंतु याशिवाय त्यांनी गुप्तहेर म्हणून रझाकारांची गुप्त माहिती स्वातंत्र सैनिकांना देण्याचेही काम केले.

19.लातूर येथील रेवण रामा वाघमारे यांनी भूमिगत राहून हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाचे कार्य केले. ते हैदराबाद स्टेट शेडयुल्ड कास्ट फेडरेशनचे हालचालीची गुप्त माहिती आप्पाराव मल्लशेट्टी आणि आप्पाराव पाठील कवळखेडकर यांच्या टोळीस देण्यास महत्त्वाचे काम केले. एवढेच नाही तर त्यांनी आप्पाराव पाटलाच्या टोळीतील लोकांना दारूगोळाही पुरविण्याचे काम केले, असे त्यांनी प्रत्यक्ष मुलाखतीत सांगितले.

### *कासीम रझवीच्या खुनाचा प्रयत्न–*

सय्यद कासीम रझवी हा फौजदारी खटल्यातील मुस्लिम आरोपीचे न्यायलयीन खटले मोफत चालवित असे. त्यामोबदल्यात त्या मुस्लिमाकडून हिंसक कृत्ये करवून घेण्यात येत असत. यावेळी तो इत्तेहादूल मुसलमीन या संघटनेच्या केंद्रीय कार्यकारीणीचा सदस्य होता. तसेच लातूरच्या स्थानिक शाखेचा अध्यक्ष होता.1942 साली

विश्वपाथप्पा कापसे, बद्रीनारायण किल्लारीवाले व विश्वनाथप्पा सोलापूरे यांनी सभा मंचावर बॉब टाकून रझवीला ठार करण्याचा प्रयत्न केला होता. यांनतर त्याला ठार करण्यासाठी दुसरा कट रचला गेला. या कटातील महत्वाची व्यक्ती नागपूर या गावचा इरप्पा महार होता.

इरप्पा महार हा रझवीच्या घरी नोकर होता. रझवीने त्याला जबरदस्तीने मुसलमान करून त्याचे नाव महमंद अली असे ठेवले होते. परंतु रझवी व त्याची पत्नी त्याला लडू या नावाने हाक मारीत. शामराव किल्लारीकर , भानुदास पैलवान, रघुवीर शिंदे , काशीनाथ भोई, गुरूबसप्पा स्वामी, एकनाथ व इराप्पा महार यांनी रझवीच्या हत्येची योजना आखली. त्यानुसार 1 ऑगस्ट 1943 रोजी सय्यद कासीम रझवी झोपत असलेल्या खोलीची खिडकी उघडी ठेवायची व रात्री दोन वाजता बाहेरच्या बाजूने खिडकीजवळ येवुन इराप्पाने उभा राहायचे. यानंतर रघूवीर शिंदेने इराप्पाच्या पाठीवर उभे राहून कासीम रझवीवर गोळया झाडून पळ काढायचा असे ठरले. या योजनेनुसार इराप्पा खिडकीच्या खाली येवुन वाकला तेंव्हा रघुवीर शिंदे ऐवजी एकनपाथ हा त्याच्या पाठीवर चढला व तो आत डोकावून पाहू लागला. तेंव्हा इतरांनी त्यास खाली उतरण्यास जोराने खुणवाखुणवी सुरू केली. तोपर्यंत रझवी जागा झाला व बंदू हातात घेवुन सज्ज झाला. त्यामुळे तो जीवंत राहू शकला. पुढे या कटाची चौकशी गुप्तहेराकडून केली असता या कटात इराप्पा महार सामील असल्याचे दिसून आले. त्यामुळे रझवीने त्यास घरात खड्डा खोदून ठार करण्याचे ठरविले. पण त्याची माहिती रझवीच्या घरी पाणी भरणाऱ्या बाईने सांगितल्यामुळे इराप्पा महार तेथून कायमचा पळाला व गायब झाला.

## दलित हुतात्मे

हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात रझाकार, रोहिले व निजामी पोलिसाबरोबर लढतांना मराठवाडयातील पुढील दलितांना वीर मरण आले.

1. नारायण जयराम महार, महारी ता. कळमनूरी 2. सुभाजी काळबा सोनकांबळे
3. विश्या विठया खंदारे, महारी ता. कळमनूरी 4. अर्जुन शिवराम सोनकांबळे
5. सदा संभा महार, डोंगरगाव, ता. कळमनूरी 6. शेटीबा माणिका बनसोडे
7.संभाजी हौसाजी, पसई , ता. कळमनूरी 8. हिरामण चांदबा पवार, निवघा, जि. नांदेड
9. संभाजी लक्ष्मण कावळे, डोरली जि. नांदेड 10. मारोती संभाजी पवार, जि. नांदेड
11. संतराम वाघमारे, कांगळी ता. बिलोली 12. दाजीबा मस्के, जालना
13. रामा सुरवसे ,उस्मानाबाद 14. सेकोजी काळबा सोनकांबळे, कल्हाळी ता. कंधार
15. येडबा तुकाराम थोरात , देवधानोरा 16. ईसा संभा थोरात ,देवधानोरा
17. गणपत जळबा मांग , तिरूका ता. उदगीर 18. गोविंद रामा महार , तिरूका ता. उदगीर
19. चंदा नागनाथ मांग, तिरूका ता. उदगीर 20.व्यंकट आनंदा भंडारे, औराद शहाजनी
21. बळीराम लक्ष्मण सरवदे, वाल्ही , ता.पाटोदा 22. विश्वनाथ गोपाळराव कांबळे , नांदूरघाट ता.केज?
23.नामदेव साहेबा गवंडी, तिरूका ता. उदगीर 24. शेटीबा ईरबा कांबळे
25.संभाजी पुरबा येडके, हदगाव जि. नांदेड 26. संतया रूक्माजी वाघमारे, कांगठी ता. बिलोली

## संदर्भ सूची –

*१.कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबडेकर, मुंबई पॉप्युलर प्रकाशन, ६ वी आवृत्ती, १९९२, पृ.४०८.*
*२.कित्ता.*
*३.The Free Press Journal, Bombay, 28 Novembar 1947, p. 3.*
*४. कीर धनंजय, पूर्वोक्त, पृ. ४१४.*
*५. महाबळे विश्वनाथ, लोहा, यांची मुलाखत, दि. १७/०६/१९९०.*
*६. डॉ. कठारे अनिल व डॉ. नगराळे एन.एन., मराठवाडयाचा इतिहास, नांदेड, कल्पना प्रकाशन, १९९९, पृ. २२५, २६.*
*७. कित्ता.*
*८. कित्ता, पृ.२२.*
*९. देऊळगावकर वि.पां., अनुवादक, पूर्वोक्त, पृ.९१.*
*१०. गर्गे स.मा., संघर्ष, खंड १, औरंगाबाद, आ. कृ. वाघमारे स्मृति समिती, १९७४, पृ. १८२.*
*११. डॉ. कुंटे भ.ग. संपा., स्वातंत्र्यसैनिक चरित्र कोश, महाराष्ट्र राज्य मराठवाडा विभाग मुंबई, महाराष्ट्र शासन, १९७६, पृ. ३३५.*
*१२. कित्ता, पृ. ३३७.*
*१३. Dhengle B.S, Hyderabad Freedom Struggle, Nanded, Kalpana Prakashan, 1998, p. 143.*
*१४. डॉ. देव प्रभाकर संपा., हैदराबादमुक्ती संग्राम-स्वातंत्र्य सैनिकांच्या मौखिक नोंदी, नांदेड, स्वा. रा. ती.म. विद्यापीठ, १९९९, पृ. ४९८.*
*१५. डॉ. कुंटे भ. ग., पूर्वोक्त, ४०७.*

१६. कित्ता, पृ. ३८३.
१७. डॉ औचरमल एल. वाय., आंबेडकरी चळवळ आणि हैदराबाद संस्थानातील दलित मुक्ती संग्राम, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९७, पृ. १४३.
१८. डॉ. गायकवाड नरेंद्र, मराठवाड्यातील दलित चळवळ आणि ह हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९०.
१९. कित्ता.
२०. माळी बळीराम, गौर ता. कळंब, प्रत्यक्ष मुलाखत, ३० ऑक्टोबर २००३.
२१. भालेराव अनंत, हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, मुंबई, मौज प्रकाशन गृह, २००१, पृ.३४२.
२२. शेख हिराजी आब्बास, उपळे माकडाचे , प्रत्यक्ष मुलाखत, दि. २ जून २००४.